# नव्या शैक्षणिक धोरणात कौशल्य विकास, संशोधनावर भर

## कुलगुरू डॉ. रजनीश कामत | 'पुण्यनगरी'शी बोलताना उलगडला जीवन प्रवास

■ निखिल गोखले ■

**■ कोल्हापूर : भारताचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे एक ऐतिहासिक पाऊल आहे. यामध्ये बहुशाखीय शिक्षण, मातृभाषेतून अध्यापन, कौशल्य विकास, संशोधन या सगळ्यांवर भर दिला आहे. यामुळे आपण योग्य दिशेने नक्कीच जात आहोत. माझ्या कार्यकाळात माध्यमातून गुणवत्तापूर्ण संशोधन, स्टार्टअप तसेच डिजिटल व पर्यावरणीय समतोल साधण्याचा प्रयत्न मी करणार आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी दैनिक 'पुण्यनगरी'ला दिलेल्या मुलाखतीत मांडले. यावेळी त्यांनी जीवन प्रवास, संशोधन, शिक्षणाची सद्यःस्थिती यासह विविध प्रश्नांवर भूमिका स्पष्ट केली.**

**प्रश्न : विद्यापीठाचे विद्यार्थी ते कुलगुरू या प्रवासाबाबत काय सांगाल?**

हा प्रवास माझ्यासाठी खरोखरच भावनिक आणि प्रेरणादायी आहे. या परिसरात बसून अभ्यास केला. या ग्रंथालयात रात्र-रात्र जागून संशोधन केलं, याच प्रयोगशाळांमध्ये विज्ञानाची जिज्ञासा जोपासली. मला विद्यापीठाचे ऋण फेडण्याची संधी आहे. माझ्या मातृसंस्थेत परत येणं हे एखाद्या नदीने आपल्या उगमस्थानी परतण्यासारखं आहे. त्यामुळे माझ्यासाठी हे केवळ करिअरचं शिखर नाही तर आत्मिक समाधान आहे.

**प्रश्न : बदलत्या शैक्षणिक धोरणाबाबत आपले मत काय ?**

३४ वर्षांनंतर आमूलाग्र विचार करून टाकलेले हे ऐतिहासिक पाऊल आहे. बहुशाखीय शिक्षण, मातृभाषेतून अध्यापन, कौशल्य विकास, संशोधन संस्कृती यावर यात भर दिला आहे. महाराष्ट्रात आपण धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी कुलगुरूंची टास्क फोर्स स्थापन केली आहे, त्याचा मी भाग आहे. आम्ही जिल्हानिहाय, शाखानिहाय गरजा ओळखून अंमलबजावणीचा आराखडा तयार करत आहोत. केवळ अभ्यासक्रम बदलून चालणार नाही. शिक्षक प्रशिक्षण, पायाभूत सुविधा आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मूल्यमापन पद्धतीत आमूलाग्र बदल हवा. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांपेक्षा विद्यार्थ्यांची क्षमता, सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याची कुशलता मोजण्याची व्यवस्था उभी केली पाहिजे.



**प्रश्न : रोजगाराभिमुख शिक्षणासाठी काय केले पाहिजे?**

आजच्या जगात एआय, डाटा सायन्स, ग्रीन टेक्नॉलॉजी ही क्षेत्रे प्रचंड वेगाने विस्तारत आहेत. पाच वर्षांपूर्वी अस्तित्वात नसलेल्या अनेक नोकऱ्या आज आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सतत शिकताना ऑनलाईन कोर्सेस, कार्यशाळेचा लाभ घ्यावा. प्रत्यक्ष अनुभव, उद्योग जगताशी जोडण्याचा प्रयत्न, संवाद कौशल्य, नेतृत्व या गोष्टींवर भर दिला पाहिजे. विद्यापीठ याच दिशेने काम करत आहे.

**प्रश्न : आपल्या कार्यकाळात कोणत्या गोष्टींवर भर देणार आहात?**

माझ्या कार्यकाळात गुणवत्ता संशोधन, आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशन वाढवणे, ग्रामीण भागाशी विद्यापीठाची नाळ जोडणे, विद्यापीठास इनोव्हेटिव्ह हब बनवणे, डिजिटल- हरित परिसर या गोष्टी माझ्या कार्यकाळात मूर्त स्वरूप घेतील, असा माझा निश्चय आहे.

**प्रश्न : शिक्षणाचे व्यावसायिकरण याबद्दल आपलं मत काय आहे?**

शिक्षण ही सेवा आहे, उद्योग नाही. ज्ञानाची जागा सर्टिफिकेटस्च्या दुकानांनी घेणे हे धोकादायक आहे. व्यावसायिकरण आणि व्यावसायिकता या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अवाच्या सव्वा शुल्क वसूल करणं, गरीब मुलांना उच्च शिक्षणापासून दूर ठेवणं मला मान्य नाही.

**प्रश्न : संशोधन क्षेत्राबाबत सरकारने काय केले पाहिजे?**

आज जग हवामान बदल, महामारी, अन्नसुरक्षा, ऊर्जासंकट अशा अभूतपूर्व आव्हानांना सामोरे जात आहे. याला उत्तर शस्त्रांनी नव्हे, तर संशोधनाने मिळणार आहे. जीडीपीच्या किमान १ टक्का रक्कम संशोधनावर खर्च झाली पाहिजे. संशोधन प्रयोगशाळेत राहून चालणार नाही, तर ते उद्योगात वापरले पाहिजे. तरुण संशोधकांना प्रोत्साहन शासनाने दिले पाहिजे. विदेशातून परतणाऱ्या शास्त्रज्ञांनाही संधी मिळावी.

### 'पुण्यनगरी'चा विस्तार म्हणजे पत्रकारितेचे लोकशाहीकरण : कुलगुरू

शिक्षण आणि माध्यमे या दोन गोष्टी समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी स्तंभ आहेत. दैनिक 'पुण्यनगरी'ने त्या भूमिकेला न्याय दिला आहे. एका दृष्टीने पाहिलं तर 'पुण्यनगरी'चा विस्तार म्हणजे मराठी पत्रकारितेचं लोकशाहीकरण आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केले. ते म्हणाले, 'पुण्यनगरी'ने वाचन संस्कृती जपली आहे. महाराष्ट्रातल्या तालुका, शहरांमध्ये, ग्रामीण भागात जिथे अन्य वृत्तपत्रांचा आवाज पोहोचत नाही, तेथे 'पुण्यनगरी' पोहोचतो. संस्थापक मुरलीधर शिंगोटे यांची कहाणी म्हणजे उद्योजकतेचा जिवंत पाठ आहे. दृष्टिकोन, चिकाटी आणि माणसांशी असलेली खरी बांधिलकी यामुळे यश मिळते हे बाबांनी सिद्ध केलंय. 'पुण्यनगरी'चा विस्तार हा कोणत्याही एमबीए पाठ्यक्रमाला लाजवेल असा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 JUN 2026
सकाळ

# वाढता ई-कचरा पर्यावरणासाठी धोक्याची घंटा : सिद्धार्थ शिंदे

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : 'वाढत्या ई-कचऱ्यामुळे पर्यावरण आणि मानवी आरोग्यास गंभीर धोका निर्माण होत आहे. त्यामुळे शाश्वत विकासासाठी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याबरोबरच ई-कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन व पुनर्प्रक्रिया याबाबत समाजात व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र आणि इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागतर्फे गणित अधिविभागातील सभागृहामध्ये 'ई-कचरा व्यवस्थापन आणि शाश्वतता' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

शिंदे म्हणाले, 'संगणक, लॅपटॉप, टॅब, मोबाईल फोन, चार्जर यामधील बॅटरी यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे जगासमोर आवाहन ठरत आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक ते संशोधन करण्याची संधी विद्यापीठास प्राप्त झाली आहे. या संशोधनामधून नवीन उद्योगाची निर्मिती होऊ शकते. ई-कचरा निर्माण होऊ नये, यासाठी समाजात जागृकता निर्माण झाली पाहिजे. भविष्यात आवश्यक असलेले हायड्रोजन इंधन प्रकल्प पुढे कसे घेऊन जाता येईल, हे विद्यापीठाने पाहावे.'

डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. इलेक्ट्रॉनिक्स् अधिविभागाचे डॉ. पी. ए. कदम, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. अजित कोळेकर, आनंद खामकर, दिनेश उथळे, शरद पाटील, उदय पोवार, विनोद लोखंडे यांच्यासह शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. सामाजिक समावेश अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किशोर खिल्लारे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 JUN 2026
तरूण भारत

# 'जैवविविधता टिकविण्यासाठी पर्यावरणपूरक जीवनशैली हवी'

प्रतिनिधी, कोल्हापूर

निसर्गाचे अस्तित्व मानवावर अवलंबून नाही, मात्र मानवाचे अस्तित्व निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल अबाधित राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजगतेने आणि जबाबदारीने वागणे अत्यावश्यक आहे. जमीन, पाणी, हवा, ऊर्जा आणि वनसंपत्ती यांचे संवर्धन केल्याशिवाय जैवविविधतेचे रक्षण होऊ शकत नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ सुधीर कुंभार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन : पर्यावरणपूरक जीवनशैलीसाठी मिशन लाईफ अभियानाअंतर्गत आयोजित 'समाज आणि शाश्वत विकास' या विषयावरील ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर होते.

डॉ. एस. ए. शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. अविनाश भाले यांनी केले, तर डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले. यावेळी मिलिंद चिटणीस, भिमराव खाडे, दिनेश उथळे, डॉ. प्रदीप नंदावर, प्रियांका स्वामी, पलक भानारकर, गौतमी भाले, नरेंद्र देशमुख, शरद पाटील, चारू भानारकर, डॉ. विलास सोयम, राजेश मेश्राम, अंजली नामे, विश्वजित गुरवआदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 2 JUN 2026

पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला १२,४४७ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला १२ हजार ४४७ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बीए., बीबीए., एमसीए., एम.टेक., बी.टेक., एमबीए., फार्मा डी. एमबीए. (डिस्टन्स) आदी ४८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ७३ केंद्रांवर झाल्या. दि. १ रोजी बी.कॉम., एमए (रशियन) एमएस्सी. (ऑर्गेनिक केमेस्ट्री) आदी १२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ५५२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. परीक्षेदरम्यान कोल्हापूर (०१), सातारा (०१) अशा दोन गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे झाली आहे. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 JUN 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील शनिवारी ८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले असून आजअखेर ५४० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत. शनिवारी विविध ३९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ६७ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ५६८५ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. शनिवारी कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली नाही.